# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २७ नोव्हेंबर २०१४

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'मुनीजन- स्वच्छ भारत अभियाना"चा शुभारंभ

मुंबई – स्वच्छता हे एक जिवनमुल्य असुन ते प्रत्येकाने स्विकारने गरजेचे आहे, त्यामध्ये प्रत्येंकांचा सहभाग वाढला तर ख-या अर्थाने स्वच्छ आणि सुंदर भारताचे स्वप्न सत्यात उतरणार असा आशावाद मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुनीजन-स्वच्छ भारत अभियान या उपक्रमाच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते. मुंबई विद्यापीठात आज मुनीजन MUNIJAN (महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज न्यू इनिशिअटिव्ह फॉर ज्वाईट एक्शन नाऊ)- स्वच्छ भारत अभिनयान या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.महाराष्ट्रातील १८ विद्यापीठ आणि जवळपास ४५०० महाविद्यालयांच्या वतीने स्वच्छ भारत अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवून या स्तूत्य उपक्रमाची शुरुवात करण्यात आली.

स्वच्छ भारत अभियान हे नित्यनियम झाले पाहिजे आणि त्याची सुरुवात स्वतःपासून व्हायला हवी तरच स्वच्छ, स्वस्थ आणि सुंदर भारताची संकल्पना सत्यात उतरु शकेल.यासाठी समाजातील सर्वांचे सहकार्य अपेक्षित असुन यामध्ये महाराष्ट्रातील तरुणाईचा सहभाग हा प्रामुख्याने वाढवावा लागेल.आज महाराष्ट्रातील तरुणाई ही संपत्ती आहे.त्यांच्यात राष्ट्रभक्तीचे अंकुर फुलावं यासाठी या संपत्तीचा योग्य वापर झाल्यास ख-या भारताचं स्पप्न सत्यात उतरु शकणार आहे.मुंबई विद्यापीठाने दिलेल्या "मुनीजन-स्वच्छ भारत अभियान" या संकल्पेसाठी मा.मुख्यमंत्र्यांनी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजन वेळूकर यांचे अभिनंदन केले.महाराष्ट्रातील विद्यापीठाअंर्गत शिकणा-या विद्यार्थ्यांचा या मुनीजन या स्तूत्य उपक्रमासाठी सहभाग लाभल्यास हे गुणीजन म्हणून देशासमोर येईल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

तर राज्याचे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी मुनीजन-स्वच्छ भारत अभियान हा एक स्तूत्य उपक्रम असुन स्वच्छता आणि समृध्दी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू असुन या उपक्रमासाठी समाजातील युवा शक्ती या उपक्रमासाठी वापरली तर शंभर टक्के हा उपक्रम फलनिश्पत्ती देणारा ठरणार असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.या उपक्रमासाठी महाविद्यालयातील फक्त राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थीच नव्हे तर प्रत्येक विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे.सामाजिक उपक्रमासाठी तरुणाईचा उपयोग करुन हे उपक्रम राबविता येईल.स्वच्छता याकडे सर्वांनी सवयीचा भाग म्हणून पाहणे गरजेचे आहे.हे माझं काम असुन त्याची सुरुवात ही स्वतःपासून करायला हवी आणि ती जाणीव प्रत्येकानी ठेवावी असाही त्यांनी मोलाचा संदेश सर्व उपस्थितांना दिला.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजन वेळूकर बोलतांना म्हणाले की, स्वच्छतेची शुरुवात ही स्वतःपासून होत असुन त्याला व्यापक दृष्टीकोन देण्याची आज काळाची गरज आहे.विद्यापीठ आणि महाविद्यलयीन स्तरावर या उपक्रमाची सुरुवात करताना आजमीतीला महाराष्ट्रात चार हजार पाचशे महाविद्यालय असुन त्यामधून जवळपास ५ लाख पदवीधारक बाहेर पडतात.हे सर्व मानव संसाधन या स्तूत्य उपक्रमासाठी वापरता येऊ शकतात आणि त्यासाठीचा हा प्रयत्न आहे.प्रत्येक महाविद्यालाचा यामध्ये सहभाग वाढवता येणे शक्य आहे.राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून हे शक्य तर आहेच मात्र सर्वच विद्यार्थ्यांचा सहभाग यामध्ये आवश्यक आहे.या संकल्पनेअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयाच्या वतीने सार्वजनिक स्थळांची निवड केली जाणार असुन त्यामध्ये स्वच्छता अभियान राबविता येईल.हा उपक्रम १५ ऑगस्ट ते २६ जानेवारी दरवर्षी राबविला जाणार असुन तो २०१९ पर्यंतचा कार्यक्रम आहे.या उपक्रमाची प्रभावी अमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालय स्तरावर संचालक,प्राचार्य,आणि कार्यक्रम अधिका-यांनी या उपक्रमावर देखरेख ठेवावी लागेल.या उपक्रमासाठी इतरांनाही प्रेरित करुन त्याची प्रभावी अमलबजावणी करता येणार असुन स्वच्छ आणि सुंदर भारताची संकल्पना सत्यात उतरु शकणार असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ.संजय चहांदे बोलतांना म्हणाले की,मुनीजन-स्वच्छ भारत अभियान या उपक्रमाची राज्यभरात प्रभावी अमलबजावणी करण्यासाठी  विद्यापीठांचा सहभाग वाढवून स्वच्छता अभियानाला साश्वत विकासाची जोड देता येऊ शकेल.राज्यात शिकणा-या २६ लाख विद्यार्थ्यांचा या उपक्रमासाठी उपयोग करुन घेता येईल आणि त्यासाठी महाविद्यालय आणि विद्यापीठांचा सहभाग वाढविण्यासाठी सर्वांनाच प्रयत्नशील राहावे लागेल असेही ते बोलताना म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.नरेश चंद्र यांनी केले,तर सुत्रसंचालन प्राचार्य डॉ.विजय जोशी यांनी केले.या कार्यक्रमासाठी राज्यातील १८ विद्यापीठांचे कुलगुरु आणि त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.या कार्यक्रमादरम्यान सर्व विद्यापीठातील कुलगुरुंना स्वच्छ भारत अभियानासाठी खास तयार केलेले मानचिन्ह (Memento) देण्यात आले.या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणातील सदस्य, अनेक महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विद्यार्थी ,राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा.डॉ.बिडवे यांनी केले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)